# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र — ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई— ४०० ०९८.

क्र. परीक्षा/कें.मु.कें./१८३/२०१९

दिनांक :— ३० एप्रिल २०१९

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित / विद्यापीठ संचलित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक यांना ज्ञात आहे की, दि. १ मे २०१९ पासून प्राध्यापकांच्या उन्हाळी सुट्टीचा (**समर व्हेकेशन**) कालावधी सुरू होत आहे व सदर कालावधीत विद्यापीठाच्या प्रथम सत्र २०१९ च्या विविध विद्याशाखांतर्गत येणा—या परीक्षा सुरू होत आहेत. तसेच झालेल्या परीक्षांच्या उत्तरपुस्तिकांच्या मुल्यांकनाचे काम OSM प्रणालीद्वारे सुरू आहे. मा. लोकसभेच्या झालेल्या निवडणुका, सनदी लेखापालन परीक्षांचे बदललेले वेळापत्रक इत्यादी बाबींमुळे सदर परीक्षांचे कामकाज उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये येत आहे.

सदर अनुषंगाने मा. कुलगुरू महोदय आपणा सर्वांना आवाहन करीत आहेत की, "या व अशा इतर कामकाजांसाठी महाविद्यालयीन प्राध्यापकाचे सहकार्य नेहमी मिळत असते तसेच ते या वेळीही मिळावे अशी अपेक्षा आहे. जर असे सहकार्य मिळाले तर यंदाचे परिक्षांचे निकाल वेळेत जाहीर करता येतील व पुढील शैक्षणिक सत्रां पासून विद्यापीठाचे शैक्षणिक वेळापत्रक सुरळीत आखता येईल प्राध्यापकांच्या सत्रांत रजेच्या आड परीक्षा येणार नाहीत असे नियोजन करता येईल. विद्यापीठाचे कुलगुरू या नात्याने मला प्राध्यापकांच्या समस्यांची जाणीव आहे व विद्यापीठ पातळीवर अश्या समस्यांचे निर्मुलन करण्याचे प्रामाणिक प्रयत्न सुरु आहेत. यांची प्रचिती नजिकच्या शैक्षणिक वर्षात येईल अशी मला खात्री आहे. तसेच प्राध्यापकांची वेळोवेळीची देयके तात्काळ देण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत. तरी सर्व महाविद्यालयीन प्राध्यापकांना मी आवाहन करतो की, विद्यापीठाच्या प्रथम सत्र २०१९ च्या उन्हाळी सुट्टी अंतर्गत येणा—या परीक्षा निवेध पार पाडण्यासाठी व उत्तर पत्रिकांचे मुल्यांकन वेळेत व्हावे यासाठी आपण प्रयत्न करावेत व परीक्षांचे निकाल ३० दिवसांत जाहीर होतील यासाठी सहकार्य करावे".

मा. कुलगुरूंच्या आवाहनास सर्व महाविद्यालयीन प्राध्यापक प्रतिसाद देतील व परीक्षा तसेच उत्तर पत्रिकांचे मुल्यांकनाचे काम तत्परतेने करतील अशी अपेक्षा खात्री बाळगतो.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

प्रत माहितीकरिता रवाना :—

१. मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२
२. मा. प्र. कुलगुरूंचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२
३. मा. संचालकांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई — ४०० ०९८
४. मा. वित्त व लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई — ४०० ०९८,
५. श्री. विनोद मळाळे, उपकुलसचिव, (जनसपंर्क अधिकारी), परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई — ४०० ०९८.

Scanned by CamScanner